# तत्वज्ञान

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.01.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# तत्वज्ञान

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

Q6Q8J8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित असलेले अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२०**
**पुनर्मुद्रण : डिसेंबर २०२०**

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**तत्वज्ञान विषय समिती**

श्रीमती मृणालिनी वनारसे, अध्यक्ष
डॉ. दीप्ति गंगावणे, सदस्य
डॉ. हरिश्चंद्र नवले, सदस्य
डॉ. शर्मिला वीरकर, सदस्य
प्रा. वर्षा जपे, सदस्य
डॉ. सीमा देशपांडे, सदस्य
डॉ. राजेसाहेब मारडकर, सदस्य
डॉ. श्रीधर आकाशकर, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**तत्वज्ञान अभ्यासगट समिती**

डॉ. नागोराव कुंभार
प्रा. शितल येरूळे
प्रा. माधवी कवि
प्रा. ईश्वरअप्पा मठवाले
डॉ. मीनल कातरणीकर
प्रा. अजय शिंगाडे
डॉ. शांताराम गोवर्धन बुटे
डॉ. संतोष ठाकरे
डॉ. सचिन बाबूराव खोकले
प्रा. विजय कारेकर
प्रा. विद्या मिलिंद गारखेडकर
प्रा. तनुजा येलाले

**लेखन गट**

श्रीमती मृणालिनी वनारसे
डॉ. वैजयंती बेलसरे
डॉ. दीप्ति गंगावणे
डॉ. शर्मिला वीरकर
डॉ. हरिश्चंद्र नवले
डॉ. राजेसाहेब मारडकर
डॉ. श्रीधर आकाशकर
डॉ. मीनल कातरणीकर
प्रा. विद्या गारखेडकर

**संयोजक**

**सौ. वर्षा सरोदे**
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ**

श्रीमती मधुरा पेंडसे

**आतील चित्रे व सजावट**

श्री. देवदत्त बलकवडे

**अक्षरजुळणी**

**डी.टी.पी. विभाग,**
बालभारती, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2021-22/Qty.-2,000

**मुद्रक**

M/s. United Multicolour Printers Pvt. Ltd., Pune

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी,** नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी,
मुंबई-२५.

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

तत्त्वज्ञान या विषयात माणसाला गेली कित्येक शतके जे अनेक प्रश्न पडत आले आहेत, त्यासंबंधी मूलभूत चिंतन केले जाते. एखाद्या अभ्यासविषयाच्या मुळाशी जाऊन त्याचा समग्रतेने आणि त्याच वेळी चिकित्सकपणे अभ्यास करणे हे तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे.

गेल्या वर्षी तुम्ही या विषयाचा आणि त्याच्या तीन प्रमुख शाखांचा परिचय करून घेतलाच आहे. त्यामुळे या विषयाबद्‌दलची तुमची जिज्ञासा वाढलेली असेल हे लक्षात घेऊन बारावीच्या पुस्तकाची रचना केली आहे. या वर्षी तुम्हाला सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतीमीमांसा या तीन शाखांमधील प्रमुख संकल्पना आणि सिद्‌धांत यांची थोडी सविस्तर ओळख करून त्याचबरोबर सौंदर्यमीमांसा या शाखेचाही परिचय करून दिला आहे.

सत्तामीमांसेची व्याप्ती आणि महत्त्व ध्यानात घेता, या पुस्तकातील पहिले तीन पाठ तत्त्वज्ञानाच्या या शाखेतील प्रश्नांची चर्चा करतात. त्याचबरोबर या प्रश्नांसंबंधी आजचे विज्ञान काय सांगते याचीही माहिती देतात. यामुळे तत्त्वज्ञान आणि विज्ञानाचा संबंध समजून घ्यायला तुम्हाला मदत होईल. ज्ञानमीमांसा हा चौथ्या पाठाचा विषय आहे. यामध्ये ज्ञानाची संकल्पना आणि ज्ञानाचे स्रोत यांची चर्चा आहे. आपल्या कृतींचे नैतिक मूल्यमापन कशाच्या आधारे करावे याचे विवेचन पाचव्या पाठात केले आहे. सहावा पाठ सौंदर्यवादी दृष्टिकोनाचे स्वरूप स्पष्ट करून कलेच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पनांची माहिती करून देतो. गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही एक पाठ विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यातील परस्परसंबंधांचे विवेचन करणारा आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचा आढावा घेताना या विकासाने निर्माण केलेल्या नीतीविषयक प्रश्नांची दखलही हा पाठ घेतो.

गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही भारतीय आणि पाश्चात्य या दोन्ही परंपरांमध्ये वरील सर्व विषयांसंबंधी जो ऊहापोह झाला आहे, त्याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे या दोन्ही परंपरांची वैशिष्ट्ये तुमच्या लक्षात येतील. त्यांच्यामधील साम्यभेदही समजतील.

अमूर्त संकल्पना आणि सिद्‌धांतांच्या स्पष्टीकरणासाठी तुमच्या माहितीतील उदाहरणांचा वापर केला आहे. त्याचबरोबर या वर्षी तत्त्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञादेखील समाविष्ट केल्या आहेत.

या पुस्तकाच्या अभ्यासाने तुमचे तत्त्वज्ञानाबद्‌दलचे कुतूहल काहीसे शमले, तरी विषयाचा अधिक सखोल आणि सांगोपांग अभ्यास करण्याची तुम्हाला इच्छा होईल, याची खात्री आहे. त्यासाठी या पुस्तकाव्यतिरिक्त इतर ग्रंथांचा, आंतरजालावरील माहितीपूर्ण लेखांचा, विश्वकोशांचा तसेच दृक्‌श्राव्य माध्यमाचाही उपयोग अवश्य करा. आपल्या मदतीसाठी क्यू.आर.कोडवर देखील माहिती ठेवलेली आहे. हा अभ्यास तुम्हाला आनंददायी आणि फलदायी होवो, यासाठी शुभेच्छा!

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०**
**भारतीय सौर : २ फाल्गुन, १९४१**

## – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीच्या पुस्तकाचे एक प्राथमिक उद्दिष्ट विद्यार्थ्यांना या नवीन विषयाची गोडी लागेल या पद्धतीने तत्त्वज्ञान या विषयाची ओळख करून देण्याचे होते. त्या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये तत्त्वज्ञानाविषयी जी उत्सुकता निर्माण झाली असेल, ती ध्यानात घेऊन या पुस्तकाची रचना केली आहे. ही रचना ज्ञानरचनावादी शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्री कृतीशील अध्यापन यांना महत्त्व देणारी आहे.

सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतीमीमांसा या तत्त्वज्ञानाच्या तीन प्रमुख शाखांबरोबरच सौंदर्यमीमांसा या शाखेच्या विवेचनाचा समावेशही या पुस्तकात केला आहे. सत्तामीमांसेची चर्चा सत्तामीमांसेतील मुख्य सिद्धांत, कार्यकारणसंबंध आणि 'स्व' विषयक आकलन या तीन मुद्द्यांच्या संदर्भात तीन पाठांत विभागून केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही संबंधित शाखांच्या संदर्भातील भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमधील मध्यवर्ती संकल्पनांचा आणि सिद्धांतांचा परिचय करून दिला आहे. त्याचप्रमाणे या शाखांमधील प्रमुख प्रश्नांबद्दल आज विज्ञानाची भूमिका काय आहे याचीही प्राथमिक माहिती प्रत्येक पाठाच्या शेवटी करून दिली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यातील संबंधांचा आणि काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा परामर्श शेवटच्या पाठात घेतला आहे. यामुळे तत्त्वज्ञानाची सध्याच्या काळातील प्रस्तुतता आणि महत्त्व समजून घ्यायला विद्यार्थ्यांना मदत होईल.

तत्त्वज्ञानातील मुख्य शाखांसंबंधी मूलभूत माहिती देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये तत्त्वचिंतनाची आवड निर्माण करणे आणि त्याआधारे जीवनदृष्टी विकसित करायला मदत करणे ही देखील या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पाठातील उपक्रम, कृती, पाठांखालचे स्वाध्याय इत्यादींची रचना त्या दृष्टिकोनातून केली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे, आवश्यक ती मदत करणे हे आपण शिक्षक या नात्याने करालच. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकाबाहेरील साधने – उदाहरणार्थ, वर्तमानपत्रे, वाचन, माहितीपट, ध्वनीफिती, चित्रपट, आंतरजालावरील अधिकृत व विश्वसनीय संकेतस्थळे यांचा उपयोग केल्यास अध्ययन आणि अध्यापन रंजक होण्याबरोबरच विद्यार्थ्यांना चिंतनशील आणि कृतीप्रवण करेल.

अकरावी आणि बारावी या दोन्ही वर्षांची पाठ्यपुस्तके एकत्रितपणे तत्त्वज्ञानाच्या अधिक सखोल आणि विस्तृत अभ्यासासाठीचा पाया म्हणून विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील. क्यू.आर.कोडच्या माध्यमातून दिलेल्या पूरक माहितीचाही त्यासाठी चांगला उपयोग करून घेता येईल.

## क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
| --- | --- | --- |
| १. | काहीतरी आहे, पण काय आहे? | • अंतिम सत्ता म्हणजे काय हे स्पष्ट करता येणे.<br>• अंतिम सत्तेच्या संख्या आणि स्वरूपाविषयीच्या विविध मतांचा परामर्श घेता येणे.<br>• भारतीय व पाश्चात्य परंपरेतील विविध मतांची तुलना करता येणे.<br>• सत्‌संबंधीचा आजचा विज्ञानविचार सांगता येणे. |
| २. | कारण म्हणजे काय? | • कार्यकारणसंबंधाच्या स्वरूपाची चर्चा करता येणे.<br>• कार्यकारणसंबंधविषयक भारतीय व पाश्चात्य विचारांचे विश्लेषण करता येणे.<br>• कार्यकारणभावासंबंधीच्या तात्त्विक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनांची तुलना करता येणे. |
| ३. | 'मी कोण आहे'? 'मी काय आहे'? | • तत्वज्ञानातील 'मी' ची संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• 'मी' विषयीच्या भारतीय व पाश्चात्य विचारांची मांडणी करता येणे.<br>• स्व-विषयक जाणिवेबद्‌दलच्या विज्ञानविचारांमधील मुख्य मुद्‌दे नमूद करता येणे. |
| ४. | कळते कसे? | • प्रमा, प्रमाता व प्रमाण यांतील परस्परसंबंध सांगता येणे.<br>• न्याय दर्शनाचा प्रमाणविचार विस्तारपूर्वक सांगता येणे.<br>• पाश्चात्य ज्ञानमीमांसेतील 'ज्ञान' संकल्पनेचे विश्लेषण करता येणे.<br>• बुद्‌धिवाद आणि अनुभववाद यांत फरक करता येणे.<br>• बुद्‌धिवाद आणि अनुभववाद यांचे मूल्यमापन करता येणे.<br>• विज्ञानाच्या दृष्टिकोनातून व्यक्ती आणि समूहाच्या जाणून घेण्याच्या प्रक्रियेतील वेगळेपणा अधोरेखित करता येणे. |
| ५. | काय करावे आणि का? | • भारतीय नीतिविचारातील कर्मसिद्‌धांत आणि पुरुषार्थ कल्पना स्पष्ट करता येणे.<br>• चार्वाक, जैन आणि बौद्‌ध दर्शनातील नीतिविचार सांगता येणे.<br>• सुखवादाचे वर्गीकरण करता येणे.<br>• कर्तव्यवाद व परिणामवादाची तुलनात्मक मांडणी करता येणे.<br>• उत्क्रांतीच्या नियमाच्या प्रकाशात नीतीमीमांसेतील समस्यांचा ऊहापोह करता येणे.<br>• कृतीची निवड करताना किंवा कृतीचे मूल्यमापन करताना नैतिक सिद्‌धांताचे उपयोजन करता येणे. |
| ६. | कलेच्या वाटेने जाताना | • मानवी जीवनातील सौंदर्यानुभवांचे महत्त्व जाणता येणे.<br>• सौंदर्यात्मक दृष्टिकोनाची वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करता येणे.<br>• सौंदर्यसंकल्पनेबद्‌दलच्या विविध मतांची चर्चा करता येणे.<br>• एखाद्या विशिष्ट कला प्रकाराची निवड करून कलाप्रक्रियेतील घटक आणि त्यातील परस्परसंबंध ओळखता येणे.<br>• सौंदर्यानुभव आणि कलानुभव यांतील वस्तुनिष्ठ असलेले घटक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून समजावून घेता येणे. |
| ७. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्वज्ञान | • तंत्रज्ञानाच्या मानवी जीवनातील वाढत्या प्रभावामुळे तत्वज्ञानासमोर निर्माण झालेल्या समस्यांची चर्चा करता येणे.<br>• माणूस आणि निसर्ग यांतील संबंधाबद्‌दलच्या विविध दृष्टिकोनांतील फरक सोदाहरण स्पष्ट करता येणे.<br>• निसर्गनियम आणि मानवी वर्तन यांतील परस्परसंबंध स्पष्ट करता येणे.<br>• परिसर तत्वज्ञानात चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांची चर्चा करता येणे.<br>• पर्यायी तंत्रज्ञान म्हणजे काय हे समजून पर्यायी जीवनशैलीचा ऊहापोह करता येणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | काहीतरी आहे, पण काय आहे ? | १ |
| २. | कारण म्हणजे काय ? | १७ |
| ३. | मी कोण आहे ? मी काय आहे ? | २९ |
| ४. | कळते कसे ? | ४० |
| ५. | काय करावे आणि का ? | ५८ |
| ६. | कलेच्या वाटेने जाताना | ७८ |
| ७. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान | ९५ |